महाराष्ट्र शासन

कृषि विभाग

कार्यालयाचे नाव-जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,जालना

संपूर्ण पत्ता-मोतीबाग समोर, जालना. पिन – 431203

दूरध्वनी क्र 02482-230918 ,

Email ID – dsaojalna@gmail.com

---

## संसाधन व्यक्ती (Resource Person) यांचे सेवा विविक्षित कामांसाठी घेणेबाबत थेट मुलाखत (Walk-In-Interview)

आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत प्रधानमंत्री शुक्ष्म खाद्य उन्नयन योजना (PMFME) या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत राज्य नोडल एजन्सीच्या वतीने जिल्हास्तरावर लाभार्थ्यांना पाठपुरावा /हाताळणी सहाय्य देण्यासाठी संसाधन व्यक्तीची नामिकासुची (Panel of Resource Person ) तयार करावयाची आहे .त्यासाठी सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनेतील अटी व शर्तीनुसार **थेट मुलाखत (Walk-In-Interview) दि. ०७.१२.२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय बचत भवन मोतीबागेसमोर जालना येथे** .आयोजित करण्यात आली आहे .

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|
| १ | संसाधन व्यक्ती (Resource Person) | नामांकित राष्ट्रीय /अंतरराष्ट्रीय विद्यापीठ संस्था यांचेकडील अन्न तंत्रज्ञान /अन्न अभियांत्रिकी मधील पदवी /पदविका अथवा ज्या व्यक्तींना अन्न प्रक्रिया उद्योग ,बँकिंग ,सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व प्रशिक्षणाचा अनुभव आहे अशा व्यक्ती . | अन्न प्रक्रिया उद्योगांना तंत्रज्ञान विकसन /वृद्धी नवीन उत्पादन विकसित करणे , उत्पादांच्या गुणवत्तेची हमी अन्न सुरक्षा व्यवस्थापन यासाठी सल्ला देण्यासंदर्भात ३ ते ५ वर्षाचा अनुभव |

संसाधन व्यक्तींना त्यांनी प्रत्येक लाभार्थ्यांना बँक कर्ज मिळवून देण्याच्या दृष्टीने जे सहाय्य केले त्यानुसार मोबदला दिला जाईल संसाधन व्यक्तीस मंजुरीनंतर प्रती बँक कर्जासाठी रु २०००० /- देण्यात येतील त्यापैकी ५०% रक्कम हि बँक कर्ज मंजुरीनंतर व उर्वरित ५०% रक्कम संबधित उद्योगास उद्योग आधार ,जीएसटी नोंदणी ,आधार नोंदणी एफएसएसएआय ची उत्पादन मानके दर्जा पूर्तता ,उद्योगाची कार्यवाही व लाभार्थ्यांना प्रशिक्षण दिल्यानंतर अदा केली जाईल याव्यतिरिक्त मार्गदर्शक सूचना ,सविस्तर पात्रता पारिश्रमिक (मानधन )व इतर अटी व शर्ती या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जालना यांचे कार्यालयात उपलब्ध आहेत .तसेच कृषी विभाग महाराष्ट्र शासन यांचे अधिकृत संकेतस्थळ www.krishi.maharastra.gov.in आणि जालना जिल्ह्याच्या jalna.nic.in यावर सुद्धा उपलब्ध आहेत .

आपला

(बी .एस रणदिवे )

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,जालना